21/08/2024, 22:05 16679748574076513812710023294636 - Sunanda Julme.jpg

**B.Aadhar'** International Peer-Reviewed Indexed Research Journal
Impact Factor -(SJIF) -7.675,Issue NO, 312 (CCCXII)
ISSN : 2278-9308
August, 2021

# भारतीय स्त्रीवादाच्या उद्गात्या : ताराबाई शिंदे

डॉ प्रा सुनंदा बोरकर जुलमे
१५२, नाईक नगर, पो. पार्वतीनगर, मानेवाडा रिंग रोड, नागपूर - 440027
Email- sunandaj205@gmail.com

गोषवारा -

स्त्री-पुरुषांमधील असमानतेवर भाष्य करणारा 'स्त्रीपुरुषतुलना' हा निबंध ताराबाई शिंदे या विदर्भ कन्येने १८८२ मध्ये लिहिला. या निबंधात त्यांनी लिंगभेदाशी निगडीत विषमतेविरुद्ध प्रखर मते मांडली आहेत. स्त्रिया जात्याच कपटी, स्वार्थी, पुरुषांना मोहात पाडणाऱ्या असतात असे म्हणत अनेक दुर्गुणांची गोणी त्यांच्यावर लादली जात...

गोषवारा -

स्त्री-पुरुषांमधील असमानतेवर भाष्य करणारा 'स्त्रीपुरुषतुलना' हा निबंध ताराबाई शिंदे या विदर्भ कन्येने १८८२ मध्ये लिहिला. या निबंधात त्यांनी लिंगभेदाशी निगडीत विषमतेविरुद्ध प्रखर मते मांडली आहेत. स्त्रिया जात्याच कपटी, स्वार्थी, पुरुषांना मोहात पाडणाऱ्या असतात असे म्हणत अनेक दुर्गुणांची गोणी त्यांच्यावर लादली जाते. ताराबाईंनी हा निबंध स्त्रियांना दुर्गुणी ठरवणाऱ्या पुरुषांना उद्देशून लिहिला असल्यामुळे अगदी प्रस्तावनेपासूनच अशा पुरुषांना त्यांनी लक्ष्य केले आहे. स्त्री आणि पुरुष यांची अनेक बाबतीत तुलना करून जे दुर्गुण स्त्रियांत असतात असे सांगितले जाते ते पुरुषात सुद्धा असतात अशी परखड मांडणी या पुस्तकातून केली आहे. स्त्रीला शास्त्र, समाज, कुटुंब त्यांच्यापासून मिळणाऱ्या तुच्छ अपमानास्पद वागणूकीचा अतिशय कडक शब्दात धिक्कार केला आहे. त्यांच्या शैलीचा धारदारपणा आणि पुरुषीवृत्तींविषयी बेधडक विधाने यामुळे हा निबंध स्त्रियांवरील अन्यायविरुद्ध प्रखर भाष्य करणारा अतिशय महत्त्वाचा निबंध ठरला आहे. ताराबाईंचा आक्रमक पवित्रा, सडेतोड युक्तिवाद आणि बुद्धिवादी भूमिका यामुळे आजच्या स्त्रीमुक्ती चळवळीला आणि स्त्रीवादी साहित्याला त्यांचे विचार प्रेरक ठरले आहेत.

बीज शब्द - स्त्रीवाद, स्वातंत्र्य, लिंगभेद, समाज, कुटुंब.

## प्रस्तावना -

'स्त्रीपुरुष तुलना' या ताराबाई शिंदे यांच्या छोटेखाणी पुस्तकाची वा ताराबाई शिंदे यांची दखल म. ज्योतीराव फुले यांच्या खेरीज तत्कालीन समाजाने, वृत्तपत्राने वा इतर सुधारकांनी घेतलेली दिसून येत नाही. 'ज्ञानोदय'सारखी तत्कालीन वृत्तपत्रे हिंदू धर्मविरोधी लेखनावर आवर्जून टीका करीत असताना या वृत्तपत्रानेही ताराबाईंच्या या लेखनाविषयी काही उल्लेख केलेला आढळत नाही. ताराबाईंच्या लेखनाचा एकमेव उल्लेख म. जोतीराव फुले यांच्या सत्सार अंक २ च्या पृष्ठ क्र. ३७३ व ३७४ वर सापडतो. ज्योतिरावांचे एक सहकारी श्री भालेकर यांनी या पुस्तकावर टीका केली. त्याला प्रत्युत्तर देताना म. फुले सत्सारमधे म्हणतात, "या पत्रकाराची (भालेकर) समजूत ती किती? याला स्वतः चि. ताराबाईसारखे शिस्तशीर लिहिता येते का?"१ या उल्लेखावरून सुप्रसिद्ध लेखक, अभ्यासक, संशोधक डॉ. स. गं. मालशे यांनी ताराबाईंचा शोध घेण्याचा प्रयत्न केला. मालशेंनी खूप परिश्रम घेतल्यानंतर ताराबाई शिंदे यांचे 'स्त्रीपुरुष तुलना' हे पुस्तक त्यांच्या हाती लागले. त्यांनी खूप खटपट आणि बराच पत्रव्यवहार करून ताराबाईंचा पूर्वइतिहास तुटक स्वरूपात का असेना गोळा केला आणि या संपादित पुस्तकाच्या प्रस्तावनेत



https://drive.google.com/file/d/11xJFKDaAq9Pagr9T1D5aD_o-JeJFsh6W/view 1/1